# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 411 018

## कर आकारणी व कर संकलन विभाग

## जाहीर आवाहन

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील इमारती व जमिनींवर कर संकलन विभागाचे 16 विभागीय कार्यालयांमार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार कर आकारणी करुन मिळकत कराची वसूली करणेत येते. अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण 8 मधील नियम 5 नुसार मिळकतधारकांनी नवीन / वाढीव बांधकाम केल्यास तसेच जुन्या मिळकतीचे वापरात बदल केल्याच्या दिनांकापासून 15 दिवसाचे कालावधीत महानगरपालिकेस कर आकारणीकामी अर्ज सादर करणे बंधनकारक आहे.

सर्व मिळकतधारक नागरिकांना आवाहन करणेत येते की, कर संकलन विभागाचे 16 विभागीय कार्यालयामार्फत दिनांक 16 एप्रिल पासून शहरातील मिळकतींचे सर्व्हेक्षण करण्यात येणार आहे. सर्व्हेक्षणाकामी येणा-या महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना आपले मिळकतीची आवश्यक ती माहिती देऊन सहकार्य करावे. तसेच कर आकारणी न झालेल्या नवीन / वाढीव तसेच वापरात बदल झालेल्या मिळकतींची वापर बदलानुसार कर आकारणी करणेकामी संबंधित विभागीय कार्यालयाशी संपर्क साधावा.

(श्रावण हर्डीकर)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – 411 018

जाहीरात क्रमांक : 1244
जावक क्रमांक : कर/मुख्य/03 /कावि/250/2018
दिनांक :12 /04/2018